# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र. - ५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtr


तात्काळ

जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१८/१०२०

दिनांक :- 18 MAY 2018

प्रतिं,

**प्राचार्य,**

**शासकीय/अनुदानित विनाअनुदानित**

पदविका/पदवी व पदव्युत्तर पदवी

अभ्यासक्रमाच्या संस्था,

**औरंगाबाद विभाग**

**विषय :- राजर्षी छपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना या योजनांच्या सन २०१७-१८ करिता तपासणीसाठी प्रलंबित अर्जासाठी उपाय योजना....**

संदर्भ :- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/वि.का.पत्र/ २०१८/ १८८ दिनांक १६/०५/२०१७

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये ज्या पात्र विद्यार्थ्यांनी वरील योजनासाठी अर्ज भरलेले आहेत परंतू काही कारणास्तव त्यांचे अर्ज तपासणी करण्याचे राहिले असल्यास अशा संस्थांनी दिनांक २४/०५/२०१८ पर्यंत प्रलंबित असलेल्या अर्जांची तपासणी या विभागीय कार्यालयाकडून संस्थेचे प्रतिनिधी या कार्यालयास प्रतिनियुक्त करुन तात्काळ करुन घ्यावी. तसेच जे अर्ज दिनांक २४/०५/२०१८ नंतर प्रलंबित/त्रुटीमध्ये राहिल ते रद्द करण्यात येतील याची सर्वस्वी जबाबदारी ही संस्थेवर राहिल याची नोंद घ्यावी. तसेच संकेत स्थळावर नविन अर्ज सादर करता येणार नाही याची ही नोंद घ्यावी.

तसेच ज्या संस्थांनी **राजर्षी छपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजने** साठी अर्ज केलेले आहेत व संस्थास्तरावर अर्ज तपासले आहेत त्यांनी त्या संबंधिचे प्रमाणपत्र या कार्यालयास दिनांक २४/०५/२०१८ पर्यंत सादर करण्यात यावे.

दिनांक २४/०५/२०१८ पर्यंत त्रुटीची पुर्तता न केलेले अर्ज रद्द करण्यात येतील याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेवर राहिल.

**(महेश शिवणकर)**

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, सन २०१७-१८ करीता राबविण्यात येणा-या "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती व डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनांचे या संस्थेच्या विद्यार्थ्यांनी भरलेले अर्ज मी संबंधित योजनांच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार तपासले आहेत. व तंत्रशिक्षण संचालनालयास शिष्यवृत्ती रक्कम डायरेक्ट बेनीफीट ट्रान्सफर (डीबीटी) - अंतर्गत ( **Adhar Based / Account Based**) थेट विद्यार्थ्यांना त्यांच्या खात्यात देण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने ॲप्रूव्ह (मान्य) केले आहेत.

स्वाक्षरी -------------------------------

प्राचार्यांचे नाव ---------------------------

प्राचार्य/डायटेक्टर,

संस्थेचे नाव व शिक्का-------------------